# प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य
## यांचे कार्यालय

**प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने),**

तळ मजला, ए विंग, वनभवन, सिव्हिल लाईन्स,

नागपूर ४४०००१ दुरध्वनी क्र. ०७१२ २५५६७६८ फॅक्स क्र. २५५६९०९

e-mail: mahaforestpublicity@gmail

Visit us at www.mahaf


क्रमांक:कक्ष-२६/प्रमाअ/प्रसिध्दी-१/प्र.क्र /      /२२-२३

नागपूर - ४४०००१ दिनांक : ०८/०६/२०२२

**विषय :** वनविभागाच्या **विविध योजनांबाबत प्रसिध्दी** देण्याकरिता **कंत्राटी तत्वावर अनुभवी व्यक्ती / संस्थांकडुन निविदा मागविणेबाबत**

**प्रस्तावना :** वन विभागामार्फत विविध योजना, कार्यक्रम, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध विशेष दिन राबविले जातात. सदरहू बाबींचा वृत्तपत्रात प्रचार व प्रसार करण्याच्या माध्यमातुन वनविभागाच्या बातम्या जनमाणसांपर्यत पोहचविणे आवश्यक आहे, जेणेकरुन जनमाणसांमध्ये वन व वन्यजीव विषयक जागृती होईल.

**कामाचे स्वरुप**

१) प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने), यांचे समन्वयाने वन मुख्यालयातील विविध विभागातील सकारात्मक बातम्यांचे संकलन व वृत्तांकन करुन इंग्रजी व मराठी भाषेमध्ये प्रसारित करणे.

२) वृत्तस्तरावरील संपर्क अधिका-याकंडुन प्राप्त वृत्तांचे संकलन व वृत्तांकन करुन प्रसारित करणे.

३) प्राप्त वृत्तांची प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने), नागपूर यांचे माध्यमातुन दैनंदिन स्तरावर वृत्तांकन करणे.

४) आवश्यकतेनुसार योजनांची यशोगाथा प्रसिध्दी करणे.

५) विभागाचे नकारात्मक बातम्यांचे क्षेत्रीय स्तरावरुन माहिती प्राप्त करुन घेवुन त्यांचे खंडण करणे व प्रसिध्द करणे.

६) वृत्तपत्र क्षेत्रातील प्रामुख्याने वने व वन्यजीव विभागाचे वृत्त संकलन करणा-या वार्ताहरामध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या दृष्टीने ३ महिन्यातुन एकदा अर्ध्या दिवसाची कार्यशाळा आयोजीत करणे. यशोगाथा ठरणा-या स्थानांना / क्षेत्रांना भेटी / क्षेत्रीय दौरे करणे

**अहर्ता :**

१) इंग्रजी / मराठी भाषेमध्ये वृत्तपत्र क्षेत्रात २० वर्ष अनुभव असणे आवश्यक आहे.

२) वने व वन्यजीव क्षेत्रात वृत्तांकनाचा किमान १० वर्ष अनुभव असणा-या व्यक्ती / संस्थांना प्राधान्य राहील.

**निविदा सादर करण्याची पध्दत व ठिकाण :**

निविदा फॉर्म www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा फॉर्म डाऊनलोड करुन व परिपुर्ण माहिती भरुन खालील पत्त्यावर दिनांक २०/०६/२०२२, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यावर **वनविभागाच्या विविध योजनांबाबत प्रसिध्दी देण्याकरिता कंत्राटी तत्वावर अनुभवी व्यक्ती / संस्थांकडुन निविदा मागविणेबाबत** असे शिर्ष लिहुन सादर करावा.

**पत्ता** : प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने),
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय,
"वनभवन", रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर – ४४०००१.

प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने)
महाराष्ट्र राज्य, नागपूर करिता

F:\meshram CDR\word_File\General.docx